ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

51@51

आम्ही ५१!



## मालिकेचा समारोप : एक चिंतन

गिरीश श्री. बापट
संचालक
ज्ञान प्रबोधिनी

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी पुन्हा संपर्कात आले. केवळ मनात असलेले भावनिक बंध विविध मार्गांनी प्रकट झाले. प्रबोधिनी हे आपले प्रबोधनाचे गुरुकुल आहे, याची जाणीव तर सगळ्यांच्या मनात असल्याचे गोष्टींमधून दिसलेच. पण बरेचजण गुरुतेचे आकर्षण भेदून, म्हणजे प्रबोधिनीच्या चौकटीने मर्यादून न जाता आपल्या नव्या वाटा, नवे विचार आणि नव्या दिशा निर्माण करत आहेत व चोखाळत आहेत, असेही त्या गोष्टींमधून लक्षात आले. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही अखेर माध्यमिक शाळा आहे. School with a purpose असे तिचे वर्णन आपण करतो. माध्यमिक शिक्षणापलीकडची अनेक उद्दिष्टे आपण दाखवतो. पण त्या नंतरच्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणात आणि नंतर प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाच्या शाळेत प्रशालेतून जी काही मूळ प्रेरणा किंवा दिशा मिळाली असेल, तिचा विस्तार–विकास आणि कदाचित रूपांतर सुद्धा प्रत्येकाने आपल्या प्रतिभेने आणि प्रयत्नाने केलेले आहे. अखेर स्वयंप्रज्ञा आणि स्वयंप्रेरणाच कामी येते.

# प्रबोधकांच्या प्रतिसादांचे अर्धशतक

**मागोवा घेण्याचे आधीचे प्रयत्न**

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेत शिकलेल्या विद्यार्थ्यांचे नंतर काय होते? ते कुठे काम करतात? काय काम करतात? काही पराक्रम करतात का? काही नवोन्मेष त्यांच्या कामात दिसतात का? आपापल्या कामाच्या ठिकाणी ते नेते म्हणून काम करतात का? अशी विचारणा अनेक जण सातत्याने करत असतात. सुमारे तीस वर्षांपूर्वी केलेल्या प्राथमिक पाहणीमधून असे लक्षात आले की, तो पर्यंत दहावी झालेले जवळजवळ निम्मे विद्यार्थी शिक्षण पूर्ण होताच किंवा एक दोन वर्षे नोकरी करून स्वतःचा काहीतरी व्यवसाय करत होते. ५०% विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगार आणि उद्योजकतेची वाट चालावी हे उल्लेखनीयच आहे. पण आम्ही देशाला २०० नेते देऊ, असे म्हणणाऱ्या प्रबोधिनीकडून समाजाची एवढीच अपेक्षा नसते.

वाच. सुजलाताई वाटवे यांनी आपल्या पी.एच.डी.च्या संशोधन प्रबंधासाठी प्रशालेच्या माजी विद्यार्थ्यांचा मागोवा हाच विषय निवडला होता. त्यांच्या संशोधन आराखड्यानुसार त्यांनी फक्त प्रशालेत शिकलेले आणि काही वर्षे प्रबोध शाळेत आणि पुढची काही वर्षे प्रशालेत शिकलेले विद्यार्थी यांची तुलना केली होती. या अंतर्गत तुलनेबरोबर प्रशालेत प्रवेश मिळूनही प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रशालेत शिकलेल्या मुलांशी तुलना केलेली होती. त्यातून प्रशालेतील शिक्षणाची काही वैशिष्ट्ये समोर आली होती. पण त्यांनी अभ्यासासाठी घेतलेली संख्या फारच थोडी होती.

**५१ गोष्टींची गोष्ट**

काही वेळा औपचारिकपणे मुलाखत देणे, प्रश्नावली सोडवणे, चाचणी देणे यापेक्षा गप्पा मारणे व आपली गोष्ट सांगणे हे जास्त जिवंत असते. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या काळात दर शनिवारी उपासनेच्या वेळी एक माजी विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी विद्यार्थ्यांशी स्वतःच्या प्रशालेतल्या अनुभवांबद्दल व नंतरच्या कामाबद्दल बोलायला येत होते. नंतर इच्छुक विद्यार्थ्यांच्या गटाबरोबर त्यांची प्रश्नोत्तरेही होत. त्या विद्यार्थ्यांच्या अनुभवांची विविधता पाहून प्राचार्य वा. मिलिंदराव नाईक यांनी दोन युवकांना एकेका माजी विद्यार्थ्याची स्वतंत्रपणे मुक्त मुलाखत घेऊन मुलाखतीचे लेखन करायला सुचवले. ते कच्चे लेखन पाहून वा. अजितराव कानिटकर यांनी ५१@५१ अशी मालिका करण्याचे सुचवले व त्यासाठीचा संच जमवून, पाठपुरावा करून हा प्रकल्प पूर्ण केला आहे. या ५१ गोष्टींमधून माहितीचा मोठा खजिनाच एकत्र झाला आहे. गेले वर्षभर दर रविवारी एकेका माजी विद्यार्थ्याची किंवा विद्यार्थिनीची गोष्ट आपल्याला वाचायला मिळत होती. प्रत्येकाची गोष्ट साधारणपणे संपादित आठ ते दहा पाने होती. बऱ्याच जणांच्या गोष्टीचा कच्चा मसुदा वीस ते पंचवीस पानांचाही झाला होता. अगदी भरभरून व मोकळेपणाने सर्वजण बोलले आहेत. त्या अनौपचारिकतेला धक्का लावायचा नाही, म्हणून मी या गोष्टींचे विश्लेषण किंवा चिकित्सा करणार नाही. गोष्ट वाचता वाचता त्या त्या वेळी संबंधितांना प्रतिसाद कळवला होताच. आता अजितरावांनी आग्रह केल्यावरून ५१ गोष्टी पुन्हा सलग वाचून त्यावरचा संकलित प्रतिसाद सर्वांसमोर मांडत आहे.

५१ मुलाखती घ्यायचे ठरल्याने साधारण २५-२६ माजी विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मुलाखती घ्याव्यात अशी कल्पना होती. प्रत्यक्षात २७ माजी विद्यार्थ्यांच्या गोष्टी आणि २५ माजी विद्यार्थिनींच्या २४ गोष्टी वर्षभरात प्रकाशित झाल्या. विद्यार्थी १९७२ ते ८१ या दहा वर्षांतील १२ तुकड्यांचे आहेत. तर विद्यार्थिनी १९८१ ते ९१ या अकरा वर्षांतील आहेत. म्हणजे प्रत्येकी सुमारे २५० ते ३०० विद्यार्थी आणि विद्यार्थिनींपैकी फक्त १०% जणांच्या गोष्टी आल्या आहेत. वर्षभराचाच प्रकल्प असल्यामुळे आणखी अनेक नावे घेता आली नाहीत व काही जणांनी स्वतःची गोष्ट सांगायला नकार दिला होता. मुलाखती घेणे, त्यांचे शब्दांकन करणे, संपादन करणे, त्या तपासून घेणे आणि अक्षरजुळणी करणे यासाठी पुन्हा एखादा संच तयार होऊ शकला, तर आणखी १००-१५० गोष्टी तरी प्रकाशित होऊ शकतील असे मला वाटते.

**विकसत जाणारा प्रयोग**

ज्ञान प्रबोधिनी हा एक अभिनव शैक्षणिक प्रयोग आहे, असे आपण म्हणत आलेलो आहोत. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला हा त्या प्रयोगातलाच एक भाग! गेल्या वर्षभरातील ५१ गोष्टी प्रशालेच्या प्रयोगाच्या पहिल्या २०-२२ वर्षांमधल्या आहेत. त्या काळात विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेच्या विकासाचे प्रयोग शाळेत चालू होते. युवक आणि युवती विभागात शारीरिक, भावनिक आणि प्रेरणात्मक विकासाचे प्रयोग चालू होते. कधी हे प्रयोग समांतर चालू असायचे, तर कधी हे प्रयोग एकमेकांत पूर्ण मिसळून गेलेले असायचे. युवकांच्या किंवा युवतींच्या पहिल्या तुकड्यांना जे अनुभवायला मिळाले, तेच सर्व दहाव्या तुकडीतील

विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाले असेल असे नाही. पहिल्या वर्षातील काही उपक्रम नंतर गळाले, तर नंतरच्या तुकड्यांना आधीच्या तुकड्यांना न मिळालेले काही उपक्रम मिळाले.

माझी प्रशालेची दुसरी तुकडी. या गोष्टींमध्ये उल्लेख आलेले दीक्षाग्रहण (विद्याव्रत संस्कार), प्रकल्प, प्रतिभाविकसन, वाचनवेग, सहाध्याय दिन यातले काहीच या नावाने आमच्या तुकडीसाठी नव्हते. पण तंबूतली व वासंतिक क्रीडा शिबिरे, पावसाळी आणि उन्हाळी सहली, पालखी आणि गणपती विसर्जन मिरवणूक हे मात्र आम्ही अनुभवले. हे उपक्रम प्रशालेचे की युवक विभागाचे हा शब्दच्छल करण्यात अर्थ नाही. ते प्रबोधिनीचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम आहेत. ज्यांनी ज्यांनी त्यांचा जेवढा अनुभव घेतला असेल, त्यांना त्याचा लाभच झालेला आहे.

प्रबोधिनीचे विचार पटले नाहीत, हे शाळेत असताना सांगणारे होते, तसे या गोष्टींमध्येही अनेकांनी सांगितले आहे. आपल्याला काय पटले किंवा पटले नाही ते मोकळेपणाने सांगण्याचे किंवा वर्ष अखेर मनोगतामध्ये लिहिण्याचे स्वातंत्र्य अनेकांनी वेळोवेळी आणि आत्ताही वापरले आहे. निर्भयतेने आपले विचार व्यक्त करण्याचा मोकळेपणा हा सुरुवातीच्या लहान संख्येच्या कौटुंबिक आकारात सहजपणे आला होता. विद्यार्थी संख्या वाढली, प्रबोधिनीच्या कामाचे आयाम वाढले, तशा व्यवस्था निर्माण करायला लागल्या. त्या औपचारिक वाटल्या तरी त्यात व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य प्रयत्नपूर्वक टिकवलेले होते. हे दहाव्या अकराव्या तुकड्यांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या गोष्टींमधून ही लक्षात आले.

### वेगळे काढून बौद्धिक शिक्षण, मिळून मिसळून सामाजिक शिक्षण

युवकांची आणि युवतींची प्रशाला आणि त्या प्रशालांपूर्वीच्या प्रबोधशाळा हे जाणीवपूर्वक केलेले शैक्षणिक प्रयोग होते. प्रवेशामध्ये वस्तुनिष्ठता राहावी म्हणून प्रवेशासाठी मानसशास्त्रीय कसोट्या वापरल्या होत्या. परंतु प्रबोधशाळेच्या पहिल्या तुकडीपासूनच वर्गातील बौद्धिक शिक्षणासाठी या चाचण्यांमधून न निवडलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी दले किंवा बैठकींच्या माध्यमातून प्रबोधिनीत यावेत, असे प्रयत्न होते. बौद्धिक विकासासाठी विद्यार्थ्यांचा निवडून वेगळा गट केला असला, तरी त्या विद्यार्थ्यांनी अभ्यासाशिवाय इतर शारीरिक, साहसी आणि व्यक्तिमत्त्व विकसनाला पूरक उपक्रमांसाठी निवड निरपेक्ष सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या बरोबरच अनुभव घ्यावेत, असा प्रयत्न होता व आहे. या प्रयत्नांमध्ये जे विविध प्रयोग झाले, त्यात कालमानानुसार वेगवेगळ्या तुकड्यांना वेगवेगळे अनुभव मिळाले. त्यानुसार आपल्या गोष्टींमध्ये बुद्धिमत्तेच्या आधारावर प्रवेश घेण्याच्या पद्धतीवर कमी अधिक तीव्र शब्दांमध्ये आपली नापसंती काही जणांनी व्यक्त केली आहे. ज्यांनी पुण्याच्या वेगवेगळ्या भागांमधल्या दलांमध्ये जाण्याचा अनुभव घेतला, ज्यांनी पुण्याबाहेर इतर गावांमध्ये जाऊन तिथल्या विद्यार्थ्यांची शिबिरे घेतली, ज्यांनी ग्रामीण भागात जाऊन तिथे विविध कार्यक्रम केले, त्यांना प्रबोधिनीची शिक्षण प्रक्रिया संतुलित वाटलेली आहे. पहिल्या दहा-बारा तुकड्यांनंतर पडसरे आश्रमशाळा, साखरशाळा इथे जाऊन राहून ज्यांनी शिकवण्याचे अनुभव घेतले आहेत, त्या विद्यार्थ्यांना तर सामाजिक वास्तवाची आपली जाणीव अधिक व्यापक झाल्याचे वाटले आहे. या अनुभवांचे सातत्य मात्र अजून वार्षिक वेळापत्रकात आपल्याला बसवता आलेले नाही.

प्रबोधिनीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आणि अध्यापक यांच्याशी असलेल्या व्यक्तिगत नात्याचा कृतज्ञतापूर्वक आणि आनंदपूर्वक उल्लेख जवळ-जवळ सर्वच गोष्टींमध्ये आलेला आहे. बुद्धीला आणि प्रयत्नांना आव्हान देणाऱ्या कामगिऱ्या आणि वर्गाबाहेरच्या अनुभवांची समृद्धी ही जशी प्रबोधिनीच्या शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये आहेत, तसेच हितेच्छू मार्गदर्शकांशी संवाद आणि त्यांचा सहवास हे सुद्धा प्रबोधिनीचे वैशिष्ट्य आहे. हे विद्यार्थ्यांना आठवते आहे आणि अजूनही ३०-४०-५० वर्षांनंतर त्यांच्या आठवणी ताज्या आहेत, हे या गोष्टींवरून जाणवते.

### सर्वांतून सारग्रहण करण्याचा प्रयत्न

व्यक्तिमत्त्वाचा विकास जसा मुक्त वातावरणात होतो, तसा तो सदिश असल्यानेही अधिक वेगात होतो. प्रबोधिनीच्या स्थापनेपासूनच प्रबोधिनीबाबत ती हिंदुत्व विचाराने प्रेरित होऊन काम करते असा अनेकांचा सार्थ समज आहे. त्यांच्या त्यांच्या हिंदुत्वाबद्दलच्या भूमिकेवरून त्याला ब्रेनवॉशिंग म्हणायचे की कंडिशनिंग म्हणायचे की ओरिएण्टेशन म्हणायचे अशा चर्चा वृत्तपत्रामधूनही झाल्या आहेत. प्रशालेची शिक्षणपद्धती जशी घडत गेली, तशी पुढच्या-पुढच्या तुकड्यांमधून विद्यार्थ्यांना हिंदुत्व विचारपद्धतीच्या बरोबर साम्यवाद, समाजवाद, गांधी विचार, आर्थिक विकासाचे प्रतिमान असा विविध विचारसरणींचा परिचयही करून देण्याचा प्रयत्न योजनापूर्वक झाला आहे. ज्यांना नववी-दहावीत असतानाच या विषयावरती व्याख्याने ऐकायला मिळाली, हे विचार प्रमाण मानून जगणारे लोक बघायला मिळाले किंवा या विचारांच्या अभ्यास शिबिरात सहभागी

व्हायला मिळाले, त्यांनी आपली मते अधिक जाणीवपूर्वक घडवली आहेत. आणि ते सगळेच हिंदुत्वविचार प्रमाण मानणारे आहेत असे नाही. काही काळ एकाच विचार पद्धतीच्या बोगद्यातून चालले असे वाटले तरी प्रत्येकाच्या अंगभूत बुद्धिमत्तेमुळे बहुतेकांनी नंतर आपापले विचारसरणींचे मिश्रण स्वतंत्रपणे तयार केलेले दिसते.

### व्यक्तिगत आणि सामूहिक उपासना

अनेक गोष्टींमध्ये कोणत्या ना कोणत्या ध्यानपद्धतीचा किंवा साधनामार्गाचा अवलंब शाळेनंतरच्या आयुष्यात केल्याचा उल्लेख आहे. आपण पूर्ण निधर्मी आहोत, असाही काही गोष्टींमध्ये उल्लेख आला आहे. परंतु शाळेत असतानाची उपासना आणि मौन याचा सगळ्यांनी आवर्जून एक उत्तम अनुभव म्हणून उल्लेख केला आहे. प्रबोधिनीच्या हिंदुत्व विचारामध्ये देशासाठी पराक्रमाची कृती करण्याचा जेवढा आग्रह आहे, त्याबरोबर प्रत्येकाने व्यक्तिगत उपासना करावी असाही आग्रह आहे. उपासना कोणत्या प्रकारची असावी, याचे स्वातंत्र्य सगळ्यांना आहेच. उपासना न करण्याचेही स्वातंत्र्य आहे. प्रत्येकाचे हे स्वातंत्र्य मान्य करण्यामध्ये हिंदुत्वाचे वैशिष्ट्य आहे. प्रबोधिनीतल्या मांडणीचा भर समूहशक्ती जागरणासाठी सामूहिक उपासनेवरही आहे. तो आग्रह विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यामध्ये मात्र अजूनपर्यंत यश आलेले दिसत नाही. ५१ पैकी एकाही गोष्टीमध्ये अजून आम्ही कुठल्यातरी गटात एकत्र उपासना करतो, असा उल्लेख नाही. हा मुद्दा लक्षात येण्याचे कारण, शेवटच्या दोन गोष्टींमध्ये मात्र आपापल्या कार्यालयात दिवसाच्या सुरुवातीला कार्यालयातल्या सर्वांनी एकत्र येऊन प्रार्थना किंवा गीत म्हणायची पद्धत सुरू केल्याचा उल्लेख आहे.

### अनेक स्तरांवर अनेक प्रकारचे नेतृत्व

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या प्रारंभीच्या कार्यक्रमात मी नेतृत्वाचे मला लक्षात आलेले काही प्रकार सांगितले होते. Expert leader, Pioneer, Path finder, Trend setter, Motivator, Team builder असे काही नेतृत्वाचे प्रकार मी तेव्हा सांगितले होते. वर्षभराने पुन्हा बोलताना काही दिवंगत मित्रांची नावे उदाहरण म्हणून त्यात घेतली होती. या एक्कावन्न गोष्टींमध्ये हे सगळे प्रकार मला सापडले. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर काम करणारे आढळले. अंगभूत कर्तृत्वाने किंवा निवडणुका लढवूनही ते या पदावर पोहोचले आहेत. काहींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्वही केले. आपापल्या संस्थेमध्ये किंवा संघटनेमध्ये एक किंवा अधिक प्रकारे नेतृत्व करणारे तर बहुतेक सर्वजण आहेतच. प्रबोधिनीमध्ये अपेक्षा मात्र त्याहून मोठ्या मांडून ठेवलेल्या असल्यामुळे या यशाच्या आनंदात रममाण होऊन चालणार नाही. हे तर सर्वांना जाणवतेच. परंतु कोणी कोणी काय काय पराक्रम केले, हे या निमित्ताने सगळ्या वाचकांसमोर नक्कीच आले. आणि पहिल्या दहा तुकड्यांमधील अनेक विद्यार्थ्यांनी तर कबड्डीचा सामना जिंकला किंवा उत्तम कविता लिहिली किंवा पाहुण्यांचा छान परिचय करून दिला, तरी आप्पांनी केळं सोलून देऊन कौतुक केल्याचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे पुढच्या पुढच्या तुकड्यांकडून 'याहून करावे विशेष' अशी अपेक्षा राहणारच. पण केले आहे तेही थोडे नाही. त्या सर्वांची नोंद यामुळे घेता आली.

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी पुन्हा संपर्कात आले. केवळ मनात असलेले भावनिक बंध विविध मार्गांनी प्रकट झाले. प्रबोधिनी हे आपले प्रबोधनाचे गुरुकुल आहे, याची जाणीव तर सगळ्यांच्या मनात असल्याचे गोष्टींमधून दिसलेच. पण बरेचजण गुरुतेचे आकर्षण भेदून, म्हणजे प्रबोधिनीच्या चौकटीने मर्यादून न जाता आपल्या नव्या वाटा, नवे विचार आणि नव्या दिशा निर्माण करत आहेत व चोखाळत आहेत, असेही त्या गोष्टींमधून लक्षात आले. ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ही अखेर माध्यमिक शाळा आहे. School with a purpose असे तिचे वर्णन आपण करतो. माध्यमिक शिक्षणापलीकडची अनेक उद्दिष्टे आपण दाखवतो. पण त्या नंतरच्या महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षणात आणि नंतर प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाच्या शाळेत प्रशालेतून जी काही मूळ प्रेरणा किंवा दिशा मिळाली असेल, तिचा विस्तार-विकास आणि कदाचित रूपांतर सुद्धा प्रत्येकाने आपल्या प्रतिभेने आणि प्रयत्नाने केलेले आहे. अखेर स्वयंप्रज्ञा आणि स्वयंप्रेरणाच कामी येते.

### शैक्षणिक आणि मानसिक समायोजन

पाचवीतच प्रशालेत प्रवेश घेतलेल्या अनेकांचे एक दुःख असते की आधीच्या शाळेत आम्ही पहिले दुसरे होतो. आता अनेक ठिकाणांहून आलेल्या बुद्धिमान चाळीस जणांमध्ये पहिले येता येत नाही. ज्या सुरुवातीच्या दहा-अकरा तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनी आपली गोष्ट सांगितली आहे, त्यांच्यावेळी तर वर्गात पंधरा, वीस किंवा पंचवीसच विद्यार्थी असायचे. तरी प्रशालेत आपण पहिले येऊ शकत नाही, हे दुःख किंवा खंत अनेकांची अभ्यासाची प्रेरणा काही काळ कमी करतेच. पण सर्वच गोष्टींमध्ये

प्रशालेतून बाहेर पडल्यावर मात्र सर्वांनी आपापल्या निवडलेल्या अभ्यासक्रमात किंवा कार्यक्षेत्रात उत्तम यश मिळवलेले दिसते. आणि या यशामध्ये प्रशालेत असताना प्रबोधिनीत, प्रशालेत किंवा दलावर, शहरात किंवा गावांमध्ये, गटकार्य आणि सहलींमध्ये, प्रकल्प आणि सहाध्याय दिनांमध्ये, पुस्तकी अभ्यासापलीकडची जी अनेक कौशल्ये शिकली, त्याचा उपयोग झाल्याचे नोंदवलेले दिसते.

प्रशालेतील विद्यार्थ्यांची काहीशी अस्वस्थता लक्षात आल्यावर एक अभ्यास प्रकल्प वाच. उषाताई खिरे यांनी केला होता. नू. म. वि. आणि सेंट व्हिन्सेंट शाळांतील 'अ' तुकडीतील विद्यार्थी आणि प्रशालेतील विद्यार्थी यांना Home Adjustment आणि School Adjustment यांच्या चाचण्या दिल्या होत्या. त्या चाचण्यांचे निष्कर्ष पाहिल्यावर सगळ्यांना धक्काच बसला. Home Adjustment मध्ये प्रशालेतील विद्यार्थ्यांचे गुण इतर दोन शाळांमधल्या मुलांपेक्षा कमी होते. कै. आप्पांनी मात्र या निष्कर्षांचा अर्थ असा लावला की ज्ञान प्रबोधिनी प्रशालेचे काम योग्य दिशेने चालू आहे. त्यांनी उषाताईंना सांगितले होते की आपण मुलांना देशाचे आणि समाजाचे प्रश्न समजून घ्या, ते सोडवण्यासाठी आपल्या शिक्षणाचा उपयोग करायचा आहे, असे सांगत असतो. इतर दोन शाळांमध्ये हे सांगत नाहीत. आपल्या मुलांना प्रशालेत जे ऐकायला मिळते, त्याच्यापेक्षा त्यांच्या घरच्या अपेक्षा वेगळ्या असतात. त्यामुळे जो काही मानसिक संघर्ष होतो, तो या चाचणीमध्ये प्रकट झाला आहे. मला उषाताईंनी सांगितलेली ही चर्चा आठवली कारण, शाळेतून बाहेर पडल्यावर काही काळ महाविद्यालयातील वातावरणाशी आणि तिथल्या विद्यार्थ्यांबरोबर जुळवून घेताना अडचणी आल्या, याचा उल्लेख अनेक गोष्टींमध्ये मधून मधून येत होता. मीही त्याच अनुभवातून गेलेलो आहे. वेगळ्या वातावरणात गेल्यावर धक्का बसतोच. धक्काच बसू नये, असे आणि एवढेच प्रबोधिनीने शिकवावे? का धक्का पचवण्याची ताकद द्यावी? ज्यांनी धक्का बसल्याचे सांगितले त्यांनी तो धक्का पचवून त्याच्यावर मात करून पुढे यशाकडे झेप घेतलेली दिसते.

### आपापले सिंहावलोकन आणि नवे संकल्प

अनेक जणांना आपली गोष्ट तयार करण्याच्या निमित्ताने आपल्या आयुष्याच्या गेल्या ३५ ते ५५ वर्षांच्या कालखंडाकडे पुन्हा बघता आले. अनेकांनी गोष्ट पूर्ण झाल्यानंतर स्वतःच्या आयुष्यातले महत्त्वाचे टप्पे, turning point, स्वतःची बलस्थाने आणि आपल्या कार्यक्षेत्रातील आपल्या कामाचे नेमके महत्त्व या सगळ्याबद्दल प्रथमच एकत्रित विचार झाला असे सांगितले. मी सर्व माजी विद्यार्थ्यांना शाळेतील–पथकातील किंवा वर्गातील मित्र आणि दलावरचे सहकारी किंवा मित्र म्हणून ओळखत होतो. त्यांच्या कर्तृत्वाचे अनेक पैलू मला नव्यानेच कळले. विद्यार्थिनींच्या पहिल्या चार तुकड्यांशी माझा फारसा संबंध नव्हता. काही जणींना तर मी गोष्टीतल्या छायाचित्रातच प्रथम पाहिले. नंतरच्या सात तुकड्यांमधील विद्यार्थिनींना मी एक सत्र ते तीन वर्षे शिकवले होते. पण तेव्हा माहिती असलेल्या विद्यार्थिनी आणि त्यांच्या गोष्टींमधून दिसणारे त्यांचे कर्तृत्व यात सकारात्मक महदंतर आहे.

प्रशालेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने विशेष उद्दिष्ट गट हे प्रबोधिनीतील सहभागाचे नवे दालन फक्त माजी विद्यार्थ्यांसाठी सुरू झाले. त्या आधी काही वर्षे प्रशालेत आजी विद्यार्थ्यांच्या बरोबर माजी विद्यार्थ्यांचे विशेष उद्दिष्ट गट सुरू झाले होतेच. पण त्यांचा उद्देश आजी विद्यार्थ्यांना विविध विषयांमधील चालू काळातील आघाडीवरचे विषय कळावेत हा होता. माजी विद्यार्थ्यांच्या विशेष उद्दिष्ट गटांनी आघाडीवरच्या विषयांवरती आणि समकालीन प्रश्नांवरती एकत्र काम करण्याची संधी निर्माण करावी, अशी इच्छा आहे. प्रबोधिनीचे नवे विभाग, नवे प्रकल्प किंवा नव्या संशोधिका यातून उभ्या राहू शकतील आणि व्यावहारिक कारणांसाठी हे प्रबोधिनीच्या औपचारिक रचनेत बसू शकले नाही तर स्वतंत्र रचना पण उभ्या राहू शकतील.

या गोष्टी वाचण्याच्या निमित्ताने जे सुचले ते लिहिले. केवळ गोष्टी वाचणे, हे सुद्धा जुन्या स्नेहबंधांना आणि ऋणानुबंधांना उजाळा आणि बळकटी आणणारे होते.

****